


आमदार अमित गोरखे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 06/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 5 ‖ अंक 258 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# राहुल गांधींच्या आरोपांवर निवडणूक आयोगाचं उत्तर

»» दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे माझी अध्यक्ष राहुल गांधी यांनी (५ नोव्हेंबर) नवी दिल्ली येथे पत्रकार परिषद घेऊन हरियाणातील विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा आरोप केला.**




राहुल गांधी यांच्या या आरोपांवर हरियाणा राज्य निवडणूक आयोगाने उत्तर दिलं आहे. भाजपा व निवडणूक आयोगाने संगन्मताने २५ लाख मतांची चोरी केल्याचा दावा देखील राहुल गाधी यांनी यावेळी केला.

यासह त्यांनी काही कथित पुरावे देखील सादर केले. एकाच मतदाराच्या वेगवेगळ्या नावांसह वेगवेगळ्या नोंदी, अनेक मतदारांच्या नावापुढे सारखाच पत्ता, त्यांच्या वयांमधला गोंधळ असे अनेक प्रकार राहुल गांधी यांनी यावेळी सादर केले.

आयोगाने १५ मुद्दे मांडत एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. निवडणूक आयोगाने म्हटलं आहे की "मतदार याद्यांची पडताळणी झाली तेव्हा काँग्रेससह विविध पक्षांच्या बूथ लेव्हल एजंट्सनी त्यावर आक्षेप का घेतले नाहीत?"

**निवडणूक आयोगाने मांडले १५ मुद्दे -**

१. २ ऑगस्ट २०२४ रोजी मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व राजकीय पक्बरोबर शेअर केली.

२. एसएसआर दरम्यान प्राप्त झालेल्या दाव्यांची आणि हरकतींची एकूण संख्या ४,१६,४०८ इतकी होती.

३. बीएलओंची (बूथ लेव्हल ऑफिसर्स) एकूण संख्या : २०,६२९

४. २७ ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांबरोबर शेअर करण्यात आली.

५. जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे ईआरओ विरुद्ध दाखल केलेल्या अपिलांची संख्या : शून्य

६. जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशांविरुद्ध सीईओंकडे दाखल केलेल्या दुसऱ्या अपिलांची संख्या : शून्य

७. अंतिम मतदार यादी १६ सप्टेंबर २०२४ रोजी निवडणूक लढवणाऱ्या सर्व उमेदवारांबरोबर शेअर करण्यात आली.

८. मतदान केंद्रांची एकूण संख्या : २०,६३२.

९. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या : १,०३१

१० . सर्व निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान एजंटांची एकूण संख्या : ८६,७९०.

११ . मतदानानंतरच्या दिवशी पडताळणीदरम्यान उमेदवारांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांची संख्या : शून्य

१२ . मतमोजणीसाठी सर्व उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतमोजणी एजंटांची संख्या: १०,१८०

१३. मतमोजणी दरम्यान निवडणूक अधिकाऱ्यांना प्राप्त झालेल्या तक्रारी/आक्षेप : पाच

१४ . ८ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणुकीचा निकाल जाहीर.

१५.निवडणुकीला आव्हान देणाऱ्या निवडणूक याचिकांची संख्या : २३

# आता दुर्गम,अल्पसेवित भागांपर्यंत इंटरनेट सेवा पोहोचेल – मुख्यमंत्री

»» दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेतच्या सामंजस्य करारामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. यामुळे राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्याची दिशा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**



स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेत सामंजस्य करारावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद – सिंघल, उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, स्पेसएक्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लॉरेन ड्रेयर, स्टारलिंक लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी मनोज लाडवा, महाआयटीचे महाव्यवस्थापक मकरंद कुरतडीकर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. यामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य ठरले आहे.स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने आपण राज्यातील शेवटच्या गावापर्यंतची डिजिटल दरी मिटवत आहोत. प्रत्येक शाळा, प्रत्येक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे, कितीही दुर्गम असो ही भागीदारी 'फ्युचर-रेडी' आणि पूर्णपणे जोडलेले महाराष्ट्र घडविण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. भारतातील पहिले राज्य म्हणून ही भागीदारी सुरू करताना अभिमान वाटत आहे. हे 'डिजिटल इंडिया'च्या ग्रामीण पातळीवरील आदर्श मॉडेल ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.आमचे ध्येय म्हणजे कुठेही, कोणत्याही पार्श्वभूमीतील लोकांना उच्च गतीची इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे असून महाराष्ट्र शासनासोबत या ऐतिहासिक सहकार्याचा भाग होणे आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे.

स्टारलिंकचे ध्येय म्हणजे पारंपरिक पायाभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या लोकांना डिजिटल विश्वात सामील करणे हे आहे. महाराष्ट्राचे समावेशक आणि डिजिटल विकासाचा लवचिक दृष्टीकोन आमच्याशी पूर्णपणे सुसंगत आहे. एकत्र येऊन आपण उपग्रह इंटरनेटद्वारे शिक्षण, आरोग्य सेवा आणि ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याचे उदाहरण निर्माण करु, असे स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर यांनी सांगितले.या माध्यमातून शासन संस्था, ग्रामीण समुदाय तसेच महत्त्वाच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांसाठी उपग्रहाधारित इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही भागीदारी भारत सरकारकडून मिळणाऱ्या नियामक व कायदेशीर मंजुरींवर आधारित असणार आहे.या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महाराष्ट्र शासन आणि स्टारलिंक मिळून राज्यातील दुर्गम व अल्पसेवित भागांना जोडण्यासाठी कार्य करतील. यात आदिवासी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्रे, तसेच गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे.

# 14 नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित 'रील स्टार'

## 'रील स्टार'चा अनोखा, संघर्षमय, प्रेरणादायी प्रवास रुपेरी पडद्यावर...

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**काही चित्रपट मनोरंजनाच्या माध्यमातून वास्तव जीवनाचे यथार्थ दर्शन घडवत अंतर्मुख करतात. त्यापैकीच एक असलेल्या 'रील स्टार' या आगामी मराठी चित्रपटाने प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण केली आहे. ट्रेलर प्रदर्शित झाल्यापासून या चित्रपटाबाबतचे कुतूहल अधिक वाढले असून, संगीत प्रकाशनानंतर या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या मनात रुंजी घालू लागली आहेत.**



प्रेक्षकांच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी हा चित्रपट १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सशक्त कथानक, कसदार अभिनय, नेत्रसुखद सादरीकरण, प्रयोगशील दिग्दर्शन, सुमधूर गीत-संगीत अशा बऱ्याच वैशिष्ट्यांनी नटलेला 'रील स्टार' प्रेक्षकांचे परिपूर्ण मनोरंजन करण्यासाठी सज्ज आहे.या चित्रपटात रील स्टारची गोष्ट पाहायला मिळणार हे शीर्षकावरून सहज लक्षात येते. आजचा जमाना रील स्टारचा आहे. आज मनोरंजनासोबतच समाजात घडणाऱ्या घटना आणि जनमानसांत उमटणारे प्रतिबिंब टिपण्याचे काम रील स्टार करत आहेत. 'रील स्टार' चित्रपटामध्ये भानुदास नावाच्या रस्त्यावरील एका विक्रेत्याची आणि त्याच्या कुटुंबाची कथा आहे. हा चित्रपट म्हणजे भानुदासच्या स्वप्नपूर्तीचा अनोखा प्रवास आहे. स्वप्नांना गवसणी घालताना त्याने दिलेला लढा पाहण्याजोगा असून, अनेकांसाठी प्रेरणादायी ठरणारा आहे. भारतातील काही सर्वोत्तम चित्रपटांची निर्मिती करणाऱ्या मल्याळम चित्रपट उद्योगातील तंत्रज्ञांची निर्मिती असलेला हा पहिला मराठी चित्रपट आहे. जोस अब्राहम, मोनिका आणि निशील कंबाती यांनी जे-फाइव्हज एंटरटेनमेंट्स, फिनिक्स ग्रुप आणि इनिशिएटिव्ह फिल्म्सच्या बॅनरखाली 'रीलस्टार' चित्रपटाची निर्मिती केली आहे. मल्टीस्टारर हिंदी-मराठी 'अन्य' या चित्रपटाचे दिग्दर्शक सिम्मी आणि रॉबिन यांनी 'रील स्टार'चे दिग्दर्शन केले आहे. सिम्मी आणि कृष्णा एंटरप्रायझेस हे चित्रपटाचे सह-निर्माते आहेत. नागराज मंजुळे यांचे सहायक दिग्दर्शक सुधीर कुलकर्णी यांनी 'रीलस्टार'चे लेखन केले आहे. या चित्रपटात वेगवेगळ्या मुद्दसमधील आणि वेगवेगळ्या प्रसंगांना अनुसरून एकूण पाच गाणी आहेत. 'दृश्यम' फेम संगीतकार विनू थॉमस यांनी या चित्रपटातील चार गीतांना संगीतसाज चढवला असून, एक गाणे संगीतकार शुभम भट यांनी संगीतबद्ध केले असून शुभम भट यांनी सुप्रसिद्ध संगीतकार ए. आर. रेहमान यांचे सहायक म्हणून काम केले आहे.या चित्रपटामध्ये भूषण मंजुळे, उर्मिला जे जगताप, प्रसाद ओक, मिलिंद शिंदे, कैलास वाघमारे, रुचिरा जाधव, स्वप्नील राजशेखर, शुभांगी लाटकर, विजय पाटकर, अनंत महादेवन, ज्ञानेश वाडेकर, महेश सुभेदार, शिवाजी पाटणे, गणेश रेवडेकर, अभिनय पाटेकर, विशाल अर्जुन, राजेश मालवणकर, जगदीश हाडप, पुनम राणे, अभय शिंदे, अनिल कवठेकर, विनिता शिंदे, प्रशांत शिंदे, करीश्मा देसले आदी कलाकार आहेत. याशिवाय बालकलाकार अर्जुन गायकर आणि तनिष्का म्हाडसे यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे क्रिएटिव्ह निर्मिती महेंद्र पाटील आहेत आणि मुख्य सहयोगी दिग्दर्शक नंदू आचरेकर आहेत. दीपक पांडे या चित्रपटाचे कास्टिंग डायरेक्टर असून, रोहित कुलकर्णी असोसिएट डायरेक्टर आहेत. या चित्रपटातील व्यक्तिरेखांना भागवत सोनावणे यांनी रंगभूषा केली असून, राणी वानखडे यांनी वेशभूषा केली आहे.

प्रोडक्शन डिझाईन राहुल शर्मा आणि समीर चिटणीस यांनी केले असून निलेश रसाळ यांनी कला दिग्दर्शन केले आहे. सारेगामा अंतर्गत या चित्रपटातील गीते सादर करण्यात येत असून सिनेपोलीस या चित्रपटाचे वितरण करणार आहे

# श्याम ग्लोबल टेक्नोवेंचर्स कडून 'इंटेलीपार्क' – स्पेस सेविंग स्मार्ट पार्किंग सिस्टमचे लोकार्पण

## मुंबई, पुणे सारख्या महानगरांतील पार्किंग समस्या सुटण्यास नवी दिशा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : वेगाने वाढणारे शहरीकरण आणि मर्यादित जागा यामुळे देशातील महानगरांमध्ये पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. प्रत्येक कुटुंबाकडे एकापेक्षा अधिक वाहने असताना, पार्किंगसाठी जागा कमी पडते आहे.**




या आव्हानाला उत्तर देण्यासाठी श्याम ग्लोबल टेक्नोवेंचर्स प्रा. लि. ने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'इंटेलीपार्क – स्पेस सेविंग स्मार्ट पार्किंग सिस्टम' विकसित केली आहे.कंपनीचे संचालक नरेंद्र गोयल म्हणाले, "इंटेलीपार्क हे आधुनिक, सुरक्षित आणि स्मार्ट शहरांसाठी तयार केलेले भविष्यदर्शी समाधान आहे.

हे सिस्टम पूर्णपणे ऑटोमेटेड असून मानवी हस्तक्षेपाशिवाय कार्य करते. आम्ही 16 मजल्यांपर्यंत मल्टीलेव्हल पार्किंग सोल्यूशन तयार करू शकतो. या संपूर्ण प्रणालीचे संचालन कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या मदतीने होते, ज्यामुळे ती अधिक कार्यक्षम आणि वापरण्यास सोपी बनते."ते पुढे म्हणाले, "2018 पासून श्याम ग्लोबल टेक्नोवेंचर्स डिझेल जनरेटर क्षेत्रात अग्रगण्य आहे.

बांधकाम क्षेत्राशी जवळीक असल्यामुळे आम्हाला शहरांतील पार्किंगची समस्या प्रकर्षाने जाणवली. त्यावर उपाय शोधण्याच्या उद्देशाने आम्ही संशोधन सुरू केले आणि त्यातून 'इंटेलीपार्क'ची निर्मिती झाली. आज आम्ही मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या प्रमुख शहरांवर लक्ष केंद्रित केले आहे."

कंपनीचे ऑपरेशन्स हेड गुलशन खजुरिया म्हणाले, "आमची कंपनी अमेरिकास्थित Peer Robotics सोबत काम करते. त्यामुळे या सिस्टममध्ये रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे. आमची प्रणाली ॲप-आधारित असल्याने वाहन मालकासाठी ती अत्यंत सोयीची ठरते.

आम्ही मल्टीलेव्हल पार्किंगसाठी आवश्यक सर्व पायाभूत सुविधा पुरवतो, त्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार सानुकूलित समाधान वेळेत मिळते."ते पुढे म्हणाले, "'इंटेलीपार्क' भारतातील स्मार्ट सिटी मिशनला बळकटी देत शहरी विका

सात एक नवा अध्याय लिहित आहे. वाढत्या शहरीकरणात हे सिस्टम केवळ पार्किंगची समस्या सोडवणार नाही, तर शहरी जीवन अधिक सुव्यवस्थित आणि सुलभ करेल."

**'इंटेलीपार्क'ची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१.स्पेस सेविंग डिझाईन: एका स्लॉटमध्ये दोन किंवा अधिक गाड्यांची पार्किंग

२.पूर्णपणे ऑटोमेटेड सिस्टम: टचस्क्रीनद्वारे सोपे ऑपरेशन

३. सुरक्षित व विश्वासार्ह: प्रगत एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान युक्त

४. कमी मेंटेनन्स आणि सानुकूलनक्षम डिझाईन

५.पझल, मल्टीलेव्हल आणि टॉवर सिस्टिम्स: मॉल, हॉस्पिटल आणि कॉर्पोरेट बिल्डिंगसाठी आदर्श

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 06/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# गेरा डेव्हलपमेंट्सकडून भारतातील पहिली “वेलनेससेंट्रिक होम्स™” संकल्पना

## आरोग्यदायी आणि संतुलित जीवनशैलीकडे एक नवा दृष्टिकोन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - पुणे, गोवा, बेंगळुरू आणि कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे नावाजलेले आणि पुरस्कारप्राप्त प्रकल्प साकार करणारे रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य नाव — यांनी पुन्हा एकदा शहरी जीवनशैलीची नवी व्याख्या सादर केली आहे.**




“गेरा वेलनेससेंट्रिक होम्स™” ही भारतातील पहिलीच अशी संकल्पना आहे, जी सर्वांगीण आरोग्याला दैनंदिन जीवनाचा मोजता येणारा भाग बनवते.“चाइल्डसेंट्रिक® होम्स”द्वारे आधुनिक कुटुंबांसाठी जीवनाचा नवा दृष्टीकोन निर्माण केल्यानंतर, गेरा डेव्हलपमेंट्स आता वेलनेस थेट घरात घेऊन आले आहे. वेलनेससेंट्रिक होम्स ही अशी राहणीमान संकल्पना आहे जिथे मन, शरीर आणि आत्म्याचा समतोल विज्ञानाधारित डिझाइन, नियोजित वेलनेस कार्यक्रम आणि समुदायातील सहभाग यांच्या माध्यमातून साधला जातो.विचारपूर्वक आखलेले लेआउट्स, शुद्ध हवा, नैसर्गिक प्रकाश आणि खास वेलनेस झोन हे सर्व एकत्र येऊन शरीर, मन आणि आत्म्याचे संतुलन निर्माण करतात. या प्रकल्पात वेलनेस हे फक्त “अ‍ॅमेनिटीज”पुरते मर्यादित नसून, डिझाइन, सेवा आणि तज्ज्ञ मार्गदर्शन यांच्या माध्यमातून ठोस आरोग्यदायी परिणाम देण्यावर भर आहे — जसे की चांगली झोप, अधिक नैसर्गिक प्रकाश, आणि सजग हालचाल. रहिवाशांना येथे योगा, पिलाटेस, एक्वा एरोबिक्स, पोषण सल्ले, वैयक्तिक फिटनेस कोचिंग आणि समुदाय-आधारित वेलनेस उपक्रमांचा अनुभव मिळणार आहे.गेरा डेव्हलपमेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक रोहित गेरा म्हणाले: “चाइल्डसेंट्रिक® ते वेलनेससेंट्रिक होम्स™ या प्रवासात आम्ही घरांना केवळ निवासस्थान न ठेवता, जीवन समृद्ध करणाऱ्या इकोसिस्टममध्ये परिवर्तित करत आहोत. आजच्या धावपळीच्या आयुष्यात काम घरात आलं आहे, स्वतःसाठी वेळ उरलेला नाही. ‘वेलनेस’ची इच्छा असते, पण ती टिकून राहत नाही. आम्ही या ‘वेलनेस इनर्शिया’वर उपाय शोधला — असा परिसर तयार करून, जिथे आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब सहज आणि नैसर्गिक वाटतो.”गेरा वेलनेससेंट्रिक होम्स™ हे डिझाइन, विज्ञान आणि जीवनशैली व्यवस्थापनाचं एकत्रित उदाहरण आहे. याचा आधार आहे आमचं विशेष ‘३-स्तरीय सवय इन्फ्रास्ट्रक्चर’ (3-tier Habit Infrastructure) —Nudge: आरोग्यदायी सवयींना चालना देणारे डिझाइनSupport: सतत तज्ज्ञ मार्गदर्शन आणि समुदाय कार्यक्रमSustain: लवचिक, वैयक्तिक योजना ज्या आयुष्यभर आरोग्य टिकवततातया दृष्टीला अधिक बळ देत, गेरा डेव्हलपमेंट्सने हृतिक रोशन यांची वेलनेससेंट्रिक होम्स™ साठी ब्रँड अ‍ॅम्बेसेडर म्हणून घोषणा केली आहे. शिस्त, संतुलन आणि सर्वांगीण फिटनेससाठी ओळखला जाणारा हृतिक या संकल्पनेच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे सुसंगत आहे.हृतिक रोशन म्हणाले: “आपल्या सर्वांचं ध्येय म्हणजे स्वतःचं आणि आपल्या प्रियजनांचं जीवन अधिक गुणवत्तापूर्ण बनवणं. गेराने वेलनेसला डिझाइनच्या केंद्रस्थानी ठेवलं आहे, आणि त्यामुळे वेलनेससेंट्रिक होम्स™ ही भविष्यकालीन घरांची उत्कृष्ट उदाहरणं आहेत. ही अशी ठिकाणं आहेत जी दररोज समतोल, सजगता आणि उद्देशपूर्ण जीवनाची प्रेरणा देतात. मला गेराच्या या दृष्टिकोनाचा भाग असल्याचा अभिमान आहे.”रोहित गेरा पुढे म्हणाले: “हृतिकचा सहभाग हा केवळ सेलिब्रिटी एंडोर्समेंट नाही. त्यांची शिस्त, फिटनेसबद्दलची बांधिलकी आणि समतोल जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आमच्या संकल्पनेशी जुळणारी आहे. तो वेलनेस ही कृती नसून एक जीवनशैली आहे, हे जगतो — आणि हेच या भागीदारीचं सार आहे.”गेरा वेलनेससेंट्रिक होम्स™द्वारे, कंपनीने नवकल्पना आणि ग्राहककेंद्रित विचारसरणीचा विस्तार केला आहे, ज्यात घरांना केवळ राहण्याचं ठिकाण न ठेवता, आरोग्यदायी, आनंदी आणि जोडलेलं जीवन जगण्यासाठी एक सजीव परिसंस्था म्हणून साकारण्यात आलं आहे.---

**गेरा डेव्हलपमेंट्स प्रा. लि. बद्दल:**

गेल्या ५० वर्षांपासून गेरा डेव्हलपमेंट्स हे पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रगण्य नाव आहे. पुणे, गोवा आणि बेंगळुरू येथे त्यांनी उच्च दर्जाचे निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प साकारले असून, कॅलिफोर्निया (अमेरिका) मध्येही त्यांनी उपस्थिती निर्माण केली आहे.गेराचं “Let's Outdo” हे तत्त्वज्ञान — नवकल्पना, पारदर्शकता आणि उत्कृष्ट ग्राहक अनुभव — यांवर आधारित आहे. भारतात ५ वर्षांची वॉरंटी देणारा पहिला डेव्हलपर म्हणून गेराने २००४ मध्ये इतिहास घडवला, आणि ७ वर्षांची वॉरंटी देणारी ही देशातील एकमेव कंपनी आहे.“चाइल्डसेंट्रिक® होम्स”, “इंटेलिप्लेक्सेस™”, “स्कायव्हिलाज™” आणि “इम्पेरियम सीरिज” यांसारख्या संकल्पनांनी त्यांनी उद्योगात नवे मापदंड निर्माण केले आहेत. “गेरा होम इक्विटी पॉवर” आणि “GeraWorld®” मोबाईल अ‍ॅप्सारख्या उपक्रमांनी ग्राहक अनुभव अधिक सुलभ आणि पारदर्शक केला आहे. “क्लब आउटडू” या टेक-आधारित लॉयल्टी प्रोग्रामद्वारे ग्राहकांना विशेष फायदे आणि समुदाय सहभागाच्या संधी दिल्या आहेत.गेरा डेव्हलपमेंट्सने सात वर्षे सलग “भारतातील सर्वोत्तम मध्यम आकाराच्या कार्यस्थळांमध्ये (Top 50 Great Mid-Size Workplaces™)” स्थान मिळवलं असून, २०२४ मध्ये “India's Best Workplaces™ in Real Estate Industry” आणि “Best in Building a Culture of Innovation for All” हे सन्मानही मिळवले आहेत.गेरा डेव्हलपमेंट्सचे ध्येय म्हणजे रिअल इस्टेट क्षेत्रातील गुणवत्ता आणि सेवांचे नवीन मापदंड प्रस्थापित करणे आणि ग्राहकांसाठी सातत्याने नवे मूल्य निर्माण करणे.

# फलटण उपनिरीक्षक गोपाळ बदने पोलीस सेवेतून बडतर्फ

## बेफिकिरी, नैतिक अध:पतन आणि अधिकार दुरुपयोगाबद्दल कठोर कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



सातारा - फलटण शहर पोलीस ठाण्यातील गु.र.नं. ३४५/२०२५ या गुन्ह्यात अटक झालेल्या पोलीस उपनिरीक्षक (निलंबित) गोपाळ बाळासाहेब बदने यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.गोपाळ बदने यांनी पोलीस दलाचे संपूर्ण ज्ञान असतानाही बेफिकिरी, नैतिक अधःपतन, दुर्वर्तन आणि पदाचा दुरुपयोग केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्या या कृत्यामुळे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पोलीस उपनिरीक्षक पदास अशोभनीय ठरेल असे वर्तन त्यांनी केले आहे.निलंबन अवस्थेत असतानाही त्यांच्या संशयास्पद वर्तनामुळे शिस्तभंगाचे गंभीर उल्लंघन झाल्याने, अशा व्यक्तीस शासकीय सेवेत ठेवणे सार्वजनिक व लोकहिताच्या दृष्टीने गैर असल्याचे नमूद करण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर, मा. श्री. सुनिल फुलारी यांनी भारतीय राज्यघटना १९५० मधील अनुच्छेद ३११(२)(ब) अन्वये दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ पासून गोपाळ बाळासाहेब बदने (फलटण ग्रामीण पोलीस ठाणे, सातारा) यांना "शासकीय सेवेतून बडतर्फ" केल्याचे आदेश जारी केले आहेत.या कारवाईने सातारा पोलीस दलात शिस्त व जबाबदारी बाबत स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 06/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आमदार अमित गोरखे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

## साहित्य जागर आणि जपले सामाजिक भान आणि जपला मैत्रभाव!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: युवा आमदार अमित गोरखे यांचा वाढदिवस मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. विविध राजकीय पक्षाचे नेते, कलावंत, साहित्यिक कामगार आणि कष्टकरी कार्यकर्त्यांची उपस्थिती आणि मांदियाळी उल्लेखनीय होती.**




साहित्य प्रदर्शन आणि विविध सामाजिक उपक्रम साजरे झाले. सर्वपक्षीय नेत्यांनी गोरखे यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला. मैत्रभावजपला."वाढदिवसानिमित्त साहित्याचा जागर केलेला पहिलाच आमदार, असे उद्गार राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे पुणे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी यांनी काढल्याने आमदार गोरखे यांच्या कार्याची प्रचिती आली. वाढदिवस सोहळा हा "सेवा, संवेदना आणि समाज बांधिलकीचा उत्सव" ठरला.राजश्री शाहू क्रीडांगण, शाहूनगर, चिंचवड येथे आमदार अमित गोरखे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला १०,००० हून अधिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित राहून आमदार गोरखे यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. संपूर्ण मैदानात जनतेचा उत्स्फूर्त सहभाग, जयघोष आणि आनंदोत्सवाचे वातावरण पाहायला मिळाले.या भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याला राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे पुणे विभाग कार्यवाह मुकुंद कुलकर्णी,हेमंत हरहरे, संदीप जाधव, संघ चालक (पिंपरी-चिंचवड) विनोद बन्सल, मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार उमा खापरे, शंकर शेठ जगताप, उमेश चांदगुडे जेष्ठ उद्योजक, माजी नगरसेविका अनुराधाताई गोरखे, मंगलाताई कदम, प्राधिकरण माजी अध्यक्ष सदाशिव खाडे,माजी नगरसेवक, शितल शिंदे, राजेश पिल्ले, संदीप वाघीरे, तुषार हिंगे, केशव घोळवे, बापू घोलप, उत्तम केंदळे, संजोग वाघिरे, संतोष कलाटे, वैशाली खाड्ये, नामदेव ढाके, महेश कुलकर्णी, मधुकर बच्चे, गणेश लंगोटे, अतुल इनामदार, राजू दुर्गे, राष्ट्रवादीचे नेते भाऊसाहेब भोईर, नाना काटे, योगेश बहल,संघाचे प्रकास मिठभाकरे ,शिवसेना कामगार नेते इरफान सय्यद, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख सुलभा उबाळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित गव्हाणे, राजू मिसाळ, नगरेसवक अमित गावडे, शैलेश मोरे, प्रमोद कुटे ,योगिता नागरगुजे, कैलास कुटे, प्रकाश बाबर, मिनल विशाल यादव, मोरेश्वर शेडगे, कुणाल लांडगे, नवनाथ जगताप, सुनिल कदम आरपीआय शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, मनसे पिंपरी विधानसभा प्रमुख दत्त देवतरासे, स्थायी समिती सभापती, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, नगरसेवक, समाजसेवक, शिक्षण संस्था चालकांसह सांस्कृतिक क्षेत्रातील सर्व मान्यवर आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले बांधव उपस्थित होते. यातून अमित गोरखे यांचा लोक संग्रह किती अफाट आहे हे दिसून आले.

# पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या विरोधात राष्ट्रवादी आक्रमक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शहरात सध्या कायदा व सुव्यवस्था औषधालाही शिल्लक नाही. भर दिवसा होणारे खून, गोळीबार, कोयत्याचे वार, लूट, टोळी युद्ध हे चित्र पुण्यात सर्वत्र दिसत आहे. पुणेकरांना दैनंदिन कामासाठी घराबाहेर पडताना जीव मुठीत घेऊन बाहेर पडावे लागत आहे.**




आपल्या परिवारातील सदस्य घराबाहेर जाताना ती जिवंत पुन्हा घरी येईल की नाही याची कोणालाही शाश्वती नाही. अशाच परिस्थितीत काल बाजीराव रोड येथे एका तरुणाची भर दिवसा निर्घृण हत्या झाली.कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असणारे, स्वतःला पुण्याचे शिल्पकार म्हणवणारे राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र बिहारमध्ये स्वतःच्या पक्षाची जाहिरात करण्यात व्यस्त आहेत.

या अनागोंदी कारभाराच्या विरोधात शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज तीव्र आंदोलन करण्यात आले. अभिनव कला महाविद्यालय चौक येथे झालेल्या या आंदोलनाच्या माध्यमातून गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा व पूर्ण वेळ आपल्या पक्षाच्या प्रचाराला द्यावा अशी मागणी करण्यात आली.

यावेळी शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या अनागोंदी कारभाराचा, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निष्क्रिय नेतृत्वाचा निषेध व्यक्त केला.

या वेळी डॉ.सुनील जगताप, किशोर कांबळे, मंजिरी घाडगे, असिफ शेख, अमोल परदेशी,अजिंकय पालकर, विष्णू सरगर, अनिता पवार, रुपाली शेलार, मदन कोठुळे, रोहन गायकवाड, फाहीम शेख, सुमित काशीद, रमीझ सय्यद ,हेमंत बधे, शिवराज मालवडकर, पुजा काटकर आणी शैलेंद्र भेलेकर उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 06/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# आमदार शंकर जगताप यांच्याकडे पिंपरी चिंचवडची कमान

## 128 नगरसदस्य; आमदार जगताप यांच्याकडे पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका टप्प्याटप्प्याने जाहीर होत आहेत नुकत्याच नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुका जाहीर झाल्या. पुढील टप्प्यात जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुका जाहीर होणार आहेत.**



भारतीय जनता पक्षाने या निवडणुका केंद्रस्थानी ठेवत मोठी घोषणा केली. जिल्हा निवडणुक प्रमुख व जिल्हा निवडणुक प्रभारी यांच्या नियुक्तीची घोषणा करताना पिंपरी चिंचवड शहरातील आगामी निवडणुकांची मोठी जबाबदारी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्याकडे सोपविण्यात आली आहेत. शहराचे निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-2025 करिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्तवाखाली प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जिल्हा निवडणुक प्रमुख व जिल्हा निवडणुक प्रभारी यांच्या नियुक्तिची घोषणा केली आहे.

यामध्ये पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप यांच्याकडे मोठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड हा कधीकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जात होता. मात्र भाजपच्या माध्यमातून लोकनेते स्वर्गीय आमदार लक्ष्मण जगताप यांनी भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्यातून पिंपरी चिंचवडचा गड भाजपाचा बालेकिल्ला म्हणून प्रस्थापित केला. 2017 मध्ये लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीमध्ये भाजप पिंपरी चिंचवडमध्ये मोठा पक्ष म्हणून पुढे आला. थम्पिंग मेजॉरिटीने भाजपने तब्बल 77 नगरसेवक पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सभागृहात नेले.

भाजपाला पहिला महापौर या शहराला लक्ष्मण जगताप यांच्या नेतृत्वाखाली मिळाला.

दरम्यान शहराध्यक्ष म्हणून काम केलेल्या आणि संघटन कौशल्य, व्यवस्थापन आणि कार्यकर्त्यांची मोट बांधण्याचे कसब असलेल्या चिंचवड विधानसभेचे विद्यमान आमदार शंकर जगताप यांच्यावर भाजपने विश्वास दाखवत मोठी जबाबदारी दिली आहे.

निवडणूक प्रमुख म्हणून शंकर जगताप आगामी निवडणुकांमध्ये पिंपरी चिंचवड शहराची कमान सांभाळणार आहेत. शहरामध्ये महापालिका निवडणुकीसाठी 128 उमेदवार रिंगणात असणार आहेत.........

### जगताप यांच्याबद्दल विश्वासाची मोहर

पिंपरी चिंचवड शहराचे नाव विकसित शहरांमध्ये अग्रक्रमाने घेतले जाते.

या शहराच्या गरजा, पुढील पन्नास वर्षांचे नियोजन, भाजपाच्या संकल्पनेतील विकसित शहर या दृष्टिकोनातून भाजपला या शहरांमध्ये पुन्हा एकदा कमळ फुलवायचे आहे.

त्या दृष्टीने उच्च विद्या विभूषित असलेल्या उमद्या नेतृत्वाकडे प्रदेश नेतृत्वाने मोठी जबाबदारी दिली आहे.

या दृष्टीने चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप निवडणूक प्रमुख पदाची जबाबदारी सक्षमपणे पार पडतील असा विश्वास भाजपच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

> **“आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक-2025 करिता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्त्वाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाने जिल्हा निवडणूक प्रमुख व प्रभारी यांची घोषणा केली आहे.या पार्श्वभूमीवर मला पिंपरी-चिंचवड शहर कार्यक्षेत्रात "निवडणूक प्रमुखपदी" नियुक्ती करून मोठी जबाबदारी दिली आहे. माझ्यासाठी ही सन्मानाची व अभिमानाची बाब आहे. पक्ष नेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखविल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. हा विश्वास सार्थ ठरेल याची मी ग्वाही देतो.या निवडणुकांसाठी मायक्रो प्लॅनिंग, कार्यकर्त्यांचे संघटन, पदाधिकाऱ्यांचा संवाद आणि सहकार्याने भारतीय जनता पक्षाचे कार्य व जनकल्याणकारी योजना प्रत्येक तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी अखंडपणे कार्यरत राहीन.”**
>
> **शंकर पांडुरंग जगताप** - आमदार, चिंचवड विधानसभा

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734